# शिक्षण विभाग प्राथमिक

# जिल्हा परिषद धाराशिव

email.mdmosmanabad@gmail.com

जिपधा/शिक्षण/आस्था-७/कावि/३३६/२०२४ दिनांक १० /०७ /२०२४

प्रति,

गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व, जिल्हा धाराशिव

विषयः- मुख्याध्यापक (प्रा.शा.) पदे पदोन्नतीने भरण्याबाबत....

संदर्भ:१) ऑनलाईन संचमान्यता सन २०२३-२४
२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०१/०८/२०१९
३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०७/०५/२०२१
४) या कार्यालयाचे पत्र दि. १३/०५/२०२४
५) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्य टिपणी दि.०९.०७.२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयी आपणास सूचित करण्यात येते की, संदर्भ क्र. ०२ व ०३ नुसार ऑनलाईन संचमान्यता सन २०२३-२४ नुसार मुख्याध्यापक १००% पदे पदोन्नतीने भरण्याबाबत निर्देश आहेत.संदर्भ क्र.४ नुसार मुख्याध्यापक (प्रा.शा.) पदे पदोन्नतीने भरण्यासाठी तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी प्रकाशित करण्यात आली होती. सदर यादीवर आलेल्या आक्षेपानंतर आक्षेप पूर्तता करून नव्याने अंतिम यादी प्रकाशित करण्यात येत आहे. सदर यादीवर ही कांही आक्षेप असल्यास संबधितानी आक्षेप लेखी पुराव्यानीशी या कार्यालयाच्या email.mdmosmanabad@gmail.com वर दि ११.०७.२०२४ रोजी सकाळी १०.०० पर्यत सादर करावे. सोबत यादीतील _शिक्षकांना समुपदेशनाने मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यासाठी समुपदेशन कै.यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद धाराशिव येथे गुरुवार दिनांक ११.०७.२०२४ रोजी सकाळी ठीक १२.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

करिता सोबत यादीतील शिक्षकांना विहित वेळेत सभागृहात समुपदेशनासाठी उपस्थित राहण्याबाबत आपल्यास्तरावरून लेखी कळविण्यात यावे.यावर एखादा कर्मचारी समुपदेशन प्रक्रिये पासून वंचित राहिल्यास व गैरहजर राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद द्यावी.

तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी स्वत: याकामी संबधित शिक्षकांची पदोन्ती साठी या कार्यालयाकडे पाठविण्यात आलेल्या परिपुर्ण प्रस्तावाची कार्यालयीन प्रत व दिलेले नकार यांच्या प्रती घेवुन पदोन्नतीचे कामकाज करणारे सहाय्यकासह ऑनलाईन संच मान्यता २०२३-२४ नुसार रिक्त व अतिरीक्त पदाचा अहवाल सह वेळेपुर्वी समुपदेशनास उपस्थित राहणे आवश्यक आहे.

(अशोक पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परीषद, धाराशिव

प्रत माहितीस्तव सविनय सेवेत सादर:-
१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव
२.मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांना देवुन वरील विषयी विनंती करण्यात येते , मुख्याध्यापक पदोन्नती साठी दिनांक ११.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता पासुन ते समुपदेशन प्रकीया पुर्ण होई पर्यत कै.यशवंतराव चव्हाण सभागृह जि.प.धाराशिव सभागृह उपलब्ध करुन देण्यात यावे ही विनंती .

Scanned with OKEN Scanner